MHPU23000964-021

**<u>आदेश नि.क्र ५ वर</u>**

१. **<u>अर्जदाराचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u>** –

अर्जदार व जाबदेणार क्र १ हे पती पत्नी असुन त्यांचा विवाह दि.०५.०२.२०१८ रोजी गाव मौजे शिक्रापुर ता. शिरूर जि. पुणे येथे झाला आहे. लग्नानंतर दोन महीने जाबदेणार यांनी अर्जदार हीस चांगले नांदविले त्यानंतर जाबदेणार हे छोटया छोटया गोष्टीवरून अर्जदार हिचेशी वाद घालुन तिला टोमणे मारत असत. जाबदेणार क्र.२ अर्जदाराचे सासरे अर्जदारास अर्वाच्च भाशेत शिवीगाळ करीत व म्हणत '' तुझ्यामुळे आम्ही आमचा ४०७ टेम्पो विकला''. अर्जदार ही कॉलेजमध्ये जात असताना तिचेवर संशय घेवुन व घरी अर्थीक अडचण सांगुन अर्जदाराचे शिक्षण बंद केले व अर्जदाराचा छळ च तिला जाच करू लागले. जाबदेणारांनी अर्जदारास शेजा–यांशी बोलण्यास मनाई केली तसेच आईवडीलांकडे जाण्यास नकार देवु लागले व छोटया छोटया गोष्टीवरून वारंवार शिवीगाळ व भांडण करून तिला त्रास देवु लागले. जाबदेणार क्र.१ हा अर्जदारावर संशय घेवु लागला व युनुस शेख नावाच्या माणसासोबत अर्जदार हिचे संबंध असल्याच्या संशयावरून अर्जदारास बेदम मारहाण केली व तिला रूममध्ये कोंडुन ठेवले. जाबदेणार क्र.१ ने अर्जदारास जबरदस्तीने तिचे आईवडीलांकडे आणुन सोडले व ''मला तुझी काहीही गरज नाह, तु इथेच मर, मी परत तुला न्यायला येणार नाही'' असे बोलुन अर्जदारास गलीच्छ भाषेत शिवीगाळ केली. अर्जदाराचे मामा यांनी जाबदेणार यांचे घरच्यांना समजावुन सांगितल्यानंतर अर्जदार ही पुन्हा सासरी नांदण्यास आली. परंतु जाबदेणार हे अर्जदार हिचेकडे वारंवार संशयी नजरेने पहात असत, अर्जदाराचा मोबाईलसुध्दा काढुन घेतला व घराच्या बाहेर जाण्यास मनाई केली. जाबदेणार क्र.२ हे अर्जदारास काहीही वाईट बोलत असत. जाबदेणार हे अर्जदाराच्या आईवडीलांना देखील गलीच्छ भाषेत शिवीगाळ करीत असत.

२. जाबदेणार क्र.१ व २ यांनी दारू पिवुन अर्जदार हिस मोठया प्रमाणात शिवीगाळ केली व बेदम मारहाण केली व अर्जदार हिस एकटीला सोडुन निघुन गेले. आजरोजी अर्जदार ही तिचे मावशीकडे रहात असुन उपाशीपोटी जीवन जगत आहे. अर्जदाराने प्रस्तुत अर्जामध्ये जाबदेणाराकडून तिला कायमस्वरूपी पोटगी म्हणुन रक्कम रू.१५,०००/– दरमहा मागणी केली आहे. तसेच राजगुरूनगर येथे राहण्यासाठी फ्लॅट घेवुन देत नाही तोपर्यंत अर्जदार हिस महीनेमहा फलॅटचे भाडे

दयावे अशी विनंती केली आहे.

३. अर्जदाराने पुढे असेही कथन केले आहे की, जाबदेणार यांच्या घरी गाव मौजे केंदुर येथे पाच ते सहा एकर बागायती जमीन असुन त्यापासुन जाबदेणार यांस मोठया प्रमाणात उत्पन्न मिळत आहे. जाबदेणार क्र.१ याचा शेलपिंपळगाव येथे भागीदारीमध्ये हॉटेलचा व्यवसाय असुन त्यापासुन त्यास दरमहा चांगले उत्पन्न मिळते. आजरोजी जाबदेणार क्र.१ याचेवर अर्जदाराव्यतिरिक्त कोणीही अवलंबुन नाही. अर्जदार हिस कोणतेही उत्पनाचे साधन नाही. जाबदेणार यांनी अर्जदार हीस कोणत्याही प्रकारची छळवणुक तसेच अर्जदारावर कोणताही कौंटूंबिक हिंसाचार करू नये असा संरक्षण आदेश पारीत करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. जाबदेणार यांनी अर्जामध्ये हजर होवून त्याचा लेखी जबाब नि.१४अ वर दाखल करून त्यांचे लग्न मान्य करून अर्जदाराच्या अर्जातील इतर कथने नाकारली आहेत. जाबदेणार याने असे कथन केले आहे की, अर्जदार ही लग्न झाल्यानंतर जाबदेणार क्र.१ यांचेकडे जास्त काळ व्यवस्थीत नांदली नाही. अर्जदार ही नेहमी कोणत्याही कारणाशिवाय माहेरी निघुन जात असे व त्यामुळे अर्जदार व जाबदेणार क्र.१ यांचेत कधीही वैवाहीक संबंध प्रस्थापीत झाले नाहीत त्यामुळे त्यांना कोणतेही अपत्ये झाले नाही. जाबदेणार क्र.१ याने अर्जदारास तिचा पुर्वीचा प्रियकरासोबत रंगेहात पकडले त्यावेळी अर्जदाराने तिच्या प्रेमसंबंधाची कबुली दिली व आईवडीलांनी जबरदस्तीने तिचे लग्न जाबदेणार क्र.१ शी लावुन दिल्याचे सांगितले व जाबदेणार क्र.१ हा तिला आवडत नसल्याचेही सांगितले. अर्जदाराने जाबदेणाराकडे घटस्फोटाची मागणी केली. दि. २५.५.२०१९ रोजी अर्जदार ही जाबदेणार क्र.१ यांना सोडुन तिचे आईवडीलांकडे गेली ती आजतागायत जाबदेणार क्र.१ यांचेकडे नांदण्यास आली नाही. जाबदेणार क्र.१ ने अर्जदाराशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला परंतु अर्जदार हिने जाबदेणार क्र.१ यांच्याशी बोलण्याचे टाळले. जाबदेणार क्र.१ हे ब–याचदा अर्जदार हीस समजावुन नांदण्यास आणण्यास गेले परंतु अर्जदाराचे आईवडील यांनी त्यांना शिवीगाळ केली. जाबदेणार क्र.१ यांनी त्यांच्या वकीलांमार्फत दि. २०.८.२०२१ रोजी रजि पोस्टाने अर्जदार हिस नोटीस पाठविली परंतु अर्जदाराने सदरच्या नोटीशीस कोणतेही उत्तर दिले नाही. त्यामुळे नाईलाजाने जाबदेणार क्र.१ याने पुणे येथेल दिवाणी न्यायाधीश साो यांचे न्यायालयात एचएमपी नं १९१८/२०२१ विवाह विच्छेदनाकरीता अर्ज दाखल केला आहे व अर्जदार हिने सदर अर्जात वकीलपत्र दाखल केले आहे. अर्जदाराने जाबदेणार यांस वैवाहीक सुखापासुन वंचीत ठेवले आहे. जाबदेणार क्र.१ हा घरातील एकमेव कर्ता पुरूष असुन त्याचे शिक्षण झालेले नसल्याने मोलमजुरीचे

काम करून त्याचे व आईवडीलांचे पोट भरत आहे. जाबदेणार क्र.१ याचेवर आईवडीलांची जबाबदारी आहे. अर्जदार ही सुशिक्षीत असुन नामांकित कंपनीमध्ये काम करत असुन त्यापासुन तिला महीन्याकाठी रक्कम रू २०,०००/– पगार मिळतो त्यामुळे ती आपला उदरनिर्वाह करण्यास समर्थ आहे. तसेच अर्जदार हिच्या आईवडीलांची परिस्थीती चांगली असुन ते बागायतदार शेतकरी आहेत. अर्जदाराने स्वतःहुन जाबदेणार क्र.१ यांचा त्याग केला असलयामुळे अर्जदाराचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

५. अर्जदार व जाबदेणाराचे म्हणणे ऐकुण घेतल्यानंतर खालील मुददे उपस्थीत होतात त्यावरील निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे,

| | <u>मुददे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १ | अर्जदार प्रथम दर्शनी असे सिध्द करते काय, कि जाबदेणारांमार्फत तिचेवर कौटूंबिक हिंसाचार झाला आहे व ती संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहे? | होय |
| २ | अर्जदार जाबदेणाराकडून पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? असल्यास किती ? | होय, अर्जदार दरमहा रक्कम रू.४०००/– |

<u>**कारणमिमांसा**</u>

<u>**मुददा क्र १ व २ करीता**</u> –

अर्जदार व जाबदेणार यांच्या विदवान अधिवक्ता यांचा युकतीवाद ऐकला. अर्जदाराच्या विदवान अधिवक्तया यांनी असा युक्तीवाद केला कि जाबदेणाराकडे उत्पन्नाचे साधन असुन सुध्दा त्याने अर्जदाराची उपेक्षा केली आहे त्यामुळे अर्जदाराला मागणीप्रमाणे पोटगी मंजुर करावी. याउलट जाबदेणाराचे विदवान अधिवक्ता यांनी युक्तीवाद केला. अर्जदार हीने स्वतःहुन जाबदेणाराचा त्याग केला असल्यामुळे तिला पोटगी मागण्याचा हक्क नाही. जाबदेणाराने अर्जदारांवर कोणताही कौटूंबिक हिंसाचार केला नाही करीता अर्ज खारीज करण्याची विनंती केली आहे. दोन्ही बाजुचा युक्तीवाद ऐकला. दस्ताऐवजांचे अवलोकन केले.

६. सद्यस्थितीमध्ये अर्जदार हीला उत्पन्नाचे साधन आहे किंवा नाही तसेच ती तिची उपजिवीका करू शकते किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे. अर्जदाराने शपथेवर कथन केले आहे

कि जाबदेणार यांनी तिचा शारीरीक व मानसीक छळ केला. जाबदेणारांच्या त्रासाला कंटाळुन अर्जदार हिला तिच्या आईवडीलांवर अवलंबुन रहावे लागत आहे. अर्जदाराने केलेल्या सत्यप्रतिज्ञेवरील कथनावरून प्रथमदर्शनी ती जाबदेणाराचे हस्ते कौटूंबिक हिंसाचाराची बळी पडली हे दिसुन येते. जरी अर्जदाराने जाबदेणाराचे उत्पन्नाबाबत कोणताही लेखी स्वरूपाचा पुरावा दाखल केला नसला तरी जाबदेणाराने स्वतःच त्याचे जबाबात मान्य केले कि तो मोलमजुरीचे काम करीत आहे. निश्चीतच सदर अर्ज अंतीमतः निकाली काढण्याकरीता कालावधी लागणार आहे. करीता माझ्या मते प्रकरणातील परिस्थीती लक्षात घेता अर्जदार हिच्या दैनंदिन गरजांकरीता जाबदेणाराकडून अंतरीम उदरनिर्वाह भत्ता मिळण्यास पात्र आहे. जाबदेणार क्र.१ यांनी अर्जदाराच्या उत्पन्नाबाबत कोणताही लेखी स्वरूपाचा पुरावा दाखल केला नाही.

७. आज रोजी जिवनावश्यक वस्तुंच्या किंमती हया झपाटयाने वाढत आहेत. एका व्यक्तीला लागणारा खर्च लक्षात घेणे योग्य होईल. अर्जदाराला स्वतःचा उदरनिर्वाह सुरळीत पार पाडण्याकरीता तिला रू. ४०००/– प्रति महा अर्ज दाखल तारखेपासुन मुख्य अर्जाचा निकाल लागेपर्यंत अंतरीम निर्वाह भत्ता मंजुर करणे न्यायोचित आहे.

८. अर्जदाराने मागणी केलेल्या इतर मागण्यांबाबत माझ्यामते योगय तो पुरावा नोंदविल्याशिवाय याक्षणी कोणतेही विवेचन करणे योग्य ठरणार नाही. करिता वरील विवेचनावरून मी मुददा क्र १ व २ ला होकारार्थी उत्तर नोंदवित असुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२. जाबदेणार क्र.१ याने अर्जदाराला रक्कम रू ४०००/–(चार हजार) प्रतिमहा अर्ज दाखल तारखेपासुन ते अंतीम अर्जाचा निकाल लागेपर्यंत उदरनिर्वाह भत्ता दयावा असा आदेश देण्यात येतो.

३. जाबदेणार यांनी अर्जदारावर कोणताही कौटूंबिक हिंसाचार करू नये.

४. सदर अर्जाची प्रत अर्जदाराला देण्यात यावी व एक प्रत संबंधीत पोलीस स्टेशनला पाठविण्यात यावी.

Sd/xx

पुणे (**एस.बी.पवार**)

दि. २०.११.२०२३ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग न्यायालय क्र १ खेड–राजगुरूनगर

I affirm that the contents of this PDF file judgment are same word for ward as per original judgment.

| | |
|---|---|
| Name of Steno | : Gilbile A.D. |
| Court Name | : S.B.Pawar |
| Date | : 20.11.2023 |
| signed by P.O. on | : 20.11.2023 |
| uploaded on | : 21.11.2023 |